# संत तुकाविप्र सांप्रदायीक आरती संग्रह

## आरती बोरबन येथील गणपतीची

आरती धुंडीराजा | लक्ष लावीन तया ||
सर्वेश सर्वसाक्षी| निजसुख दातया ||
आरती धुंडीराजा||१||
प्रसन्न गजमुखा | होय स्वामी विनायका ||
कीर्तन रंग देई | जेणे होय हरीकथा ||
आरती धुंडीराजा ||२||
कीर्तन प्रेमरंग | नित्यनेम सत्संग ||
आनंद वृत्ती सदा | प्रेमे देई अभंग ||
आरती धुंडीराजा ||३||
अभंग एकदंता | सिध्दी बुद्धीचे कांता ||
प्रमाण आरती हे | होय प्रसन्न आता ||
आरती धुंडीराजा ||४||
स्वामीया भालचंद्रा | तुकाविप्र हाती धरा ||
गर्जाया नाम हारी | भक्ती भावे उभा करा ||
आरती धुंडीराजा ||५||

## आरती विठ्ठलाची

सदभावे आरती विठ्ठल तुज देवा
विटेवरल्या स्वामी उभया निजभावा
भीमातीर वासी देवधिदेवा
करुणा सिंधु म्हणती राधा माधवा ||१||
जयदेव जयदेव जय रुक्मीणी रमणा |
ओवाळू आरती विठ्ठल समचरणा || जयदेव जयदेव||
पंचाग्नी मस्तकी मुगूट साजीरा
चरणी वाहे भीमा जगदउद्धारा
विष्णूवरल्या भूमी पंढरीया चक्रा
संतसाधू योगे विश्रांती थारा ||२||
जयदेव जयदेव जय रुक्मीणी रमणा |
ओवाळू आरती विठ्ठल समचरणा || जयदेव जयदेव||
सदभावे आरती देवाही केली
विनंती करी वस्तु अभंगे पावली
पीतांबरे करा कृपा साऊली
तुकाविप्र पदी त्रिभूवन ओवाळी ||३||
जयदेव जयदेव जय रुक्मीणी रमणा |
ओवाळू आरती विठ्ठल समचरणा || जयदेव जयदेव||

## आरती रुक्मीणीची

अनादि सिद्धमाय भुवनत्रय जननी
तुझेनीयोगे देवा थोरी या तिन्ही
आकाश पृथ्वी वायू जलदेव वन्ही
सर्वही आले उदया तुझ्या कृपेनी ||१||
जयदेवी जयदेवी जय रुक्मीणी माते
ओवाळु आरती सदगुरु सुख भरीते || जयदेवी जयदेवी ||
सर्वाधार माय तुझ्या कृपेचा
तुझ्या कृपे वेदा फुटली वाचा
तेथे अम्बे पाड किती आमुचा
घाली पान्हा आता पुर्ण कृपेचा ||२||
जयदेवी जयदेवी जय रुक्मीणी माते
ओवाळु आरती सदगुरु सुख भरीते || जयदेवी जयदेवी ||
तुकाविप्र दास अनादि गुरुमाय
कृमा करुनी दावी हीन दीना तू पाय
त्रिभुवन पालन करीसी बहु तुजला काय
विनंती करणे ऐसी भेटी तू देय ||३||
जयदेवी जयदेवी जय रुक्मीणी माते
ओवाळु आरती सदगुरु सुख भरीते || जयदेवी जयदेवी ||

## आरती दत्ताची

आरती दत्त देवा | ब्रम्हा विष्णू सदाशिवा ||
त्रैमुर्ती गुरुराया | कृपा लोभ करावा ||
आरती दत्त देवा ||धृ||
अभंग विनवणी | भावे जोडोनी पाणी ||
केली हे परीसावी | कथा नाम रंगणी ||
आरती दत्त देवा ||१||
सत्संग हरीकथा | नित्य नेम समर्था ||
प्रमाण भेट तुझी | हेच पाहीजे आता ||
आरती दत्त देवा ||२||
सत्गुरु दासाहे | केली विनंती पाहे ||
प्रसिद्ध कृपादृष्टी  तुकाविप्र हेतु आहे ||
आरती दत्त देवा ||३||

## आरती विप्रनाथ स्वामींची

आरती विप्रदेवा |  नाथ एक माणकोबा ||
अनाथ दिनबंधू | ब्रम्हा विष्णू श्री शिवा ||धृ||

त्रैमुर्ती वृक्षरुपा | तुम्हा स्वामी घन कृपा ||
ओवाळू प्रेम भावे | विप्रनाथ मायबापा ||
आरती विप्रदेवा ||१||
जढमुढ तारावया | अवतार जगी या ||
नररुप नारायण | माणकोबा नामध्येया ||
आरती विप्रदेवा ||२||
विप्रनाथ नाम साजे |गुरु मायबाप माझे ||
समाधी वृक्षरुप | पूर्णब्रम्ह अवतार सहजे||
आरती विप्रदेवा ||३||
देवाधिदेव गुरु | विप्र नाम भवतारु||
दास मी दीन तुका  | गुरु कृपा विप्र तारू ||
आरती विप्रदेवा ||४||

## आरती कृष्णा नदीची

औट कोटी तीर्था | वंद्य तू जननी ||
पवन स्पर्शे जडमूढ | पावन तुझेनी ||
जलरुपी अवतार | हरीहरा वनी ||
कलीयुगी हे वस्ती | तुझ्या कृपेनी ||
जयदेवी जयदेवी | जय श्री कृष्णे माते ||
ओवाळू आरती|  हरीहर  सुख सरीते ||
||जयदेवी जयदेवी ||१||
स्मरणमात्रे पावन |  करीसी तू सकळा ||
अनंत नामे तुझी |  अनंतशा लीला ||
तुझेनी योगे | पापे होती धुरळा ||
म्हणोनि माझी वाणी | हीन दीन उद्धरा ||
जयदेवी जयदेवी | जय श्री कृष्णे माते ||
ओवाळू आरती|  हरीहर  सुख सरीते ||
||जयदेवी जयदेवी ||२||
श्री कृष्णे माऊली | हे तुजला विनंती ||
हीन दीन सुख हे माझे |  राहो तव चित्ती ||
विश्वास नेमे | दे क्षमा शांती ||
तुकाविप्र कृपा | करावी पूर्ती ||
जयदेवी जयदेवी | जय श्री कृष्णे माते ||
ओवाळू आरती|  हरीहर  सुख सरीते ||
||जयदेवी जयदेवी ||३||

## आरती बोरबन येथील विठोबाची

ओवाळू आरती सावळया हरी |
रामराजा विठोबा उभा कृष्णेच्या तीरी ||
कृष्णा वेणू तनू वेण्या विश्वाच्या माता
ऐका भावे पुरी ब्रम्ह आलीया सरीता ||१||

सरीता या मीळूनी पदी विष्णुच्या आल्या
नाथ शिव ऋषी सप्त पाहूनिया धाल्या ||२||

धालेपण हे भाक मागीतली देवा
येथे वस्ती करा माझ्या जीवाचीया जीवा ||३||

धालेपण हे भाक मागीतली द्यावी
ब्रीदापयी देवा पतित पावना पुरवावी ||४||

पूर्वी दिली भाक आली विठा येती जे
तुकाविप्र पूजी  पाय  साधूसंताचे ||५||

ओवाळू आरती सावळया हरी |
रामराजा विठोबा उभा कृष्णेच्या तीरी ||